पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
नविन मध्यवर्ती इमारत, ३ रा मजला, पुणे
Ph No- ०२०- २६१२६६२८/२६१२३९८५ Fax- ०२०- २६१२७००४
Gmail- dirmktms@gmail.com Website- mahapanan.maharashtra.gov.in

---

जा.क्र.पणन-५/कृउबास / ७ वा वेतन आयोग /सन २०१९ / 3991 दिनांक:-१४/०८/२०१९

विषय - महाराष्ट्र राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समिती मधील कायम कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लागु करणेबाबत.

संदर्भ :- १) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाजार समिती कर्मचारी संघ, पुणे यांचे दिनांक १६.०३.२०१९ चे पत्र.
२) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ,पुणे यांचे दिनांक १३.५.२०१९ चे पत्र.
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक पणन-५/कृउबास/७ वा वेतन आयोग /सन २०१९/२०८३/ दिनांक २५.०६.२०१९ चे पत्र.
४) शासन पत्र क्रमांक कृउबा-०७१९/प्र.क्रं.१४८/२१-स, दि. २६ जुलै २०१९.

**-: परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासनाने त्यांच्या कर्मचा-यांना सातव्या आयोगाच्या अनुषंगाने वेतनश्रेणी मध्ये दुरुस्ती करुन वाढ केलेली आहे.

२/- महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ झाल्यानंतर महाराष्ट्रातील बाजार समिती कर्मचा-यांना सातव्या आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करणेबाबत महाराष्ट्र राज्य बाजार समिती -कर्मचारी संघ पुणे व महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघ, पुणे यांनी मागणी केलेली आहे.

३/- या कार्यालयाचे पत्र क्रमांक पणन-५/कृउबास/७ वा वेतन आयोग /सन २०१९/२०८३ दिनांक २५/०६/२०१९ अन्वये या कार्यालयाने शासनास प्रस्ताव पाठविला आहे. त्यामध्ये ज्या बाजार समित्यांना वित्तीय क्षमतेमध्ये सातवा वेतन आयोग देणे शक्य आहे अशांना सातवा वेतन आयोग लाग करण्यास मान्यतेची शिफारस केली आहे. त्यावर शासन पत्र क्रमांक कृउबा-०७१९/प्र.क्रं.१४८/२१-स, दि.२६ जुलै २०१९. रोजी दिलेल्या पत्रात शासनाने राज्यातील ज्या बाजार समित्यांना त्यांच्या कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वेतन व भत्ते देणे आर्थिक दृष्टया शक्य आहे त्यांनी त्यांच्या कायम कर्मचा-यांना आस्थापना खर्चाच्या मर्यादेत , शासकीय कर्मचा-यांप्रमाणे, शासनाने जाहीर केलेल्या दिनांकापासून ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन व भत्ते अदा करण्याबाबत योग्य तो निर्णय बाजार समितीने त्यांच्या स्तरावर घेण्यात यावा असे स्पष्ट नमूद केले आहे.

**४/- उपरोक्त सर्व परिस्थितीचा विचार करता खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यांत येत आहे.**

१. बाजार समितीचे जे कर्मचारी कायम आहेत व ज्या कर्मचा-यांना महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन ) नियम १९६७ मधील नियम १००(५) अन्वये मान्यता घेतली आहे, अशा कर्मचा-यांना सदर आदेशानुसार सुधारीत वेतनश्रेणीचा फायदा लागू करता येईल.

२. सुधारित वेतनश्रेणी, बाजार समित्यांची वर्गवारी, व आस्थापना खर्चाची टक्केवारी याबाबत सोबत परिशिष्ट "अ" जोडले आहे. बाजार समितीचा आस्थापना खर्च सध्या व पुढील पाच वर्षात सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ"मधील विहित प्रमाणाच्या आत राहील, अशा बाजार समित्यांनाच सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागु करता येईल.

३. बाजार समितीने कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करणेसाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांची परवानगी घ्यावी. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी बाजार समित्यांची आर्थिक स्थिती तपासुन बाजार समितीने सातव्या वेतन आयोग लागु केली तरी बाजार समितीचा आस्थापना खर्च विहीत मर्यादेत रहात असलेबाबतची खात्री करुन अशी परवानगी देण्याबाबत निर्णय घ्यावा.

४. सुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन निश्चित करताना महाराष्ट्र शासनाने वेतन निश्चिती संदर्भात जी पध्दत वेळोवेळी स्विकारलेली आहे. त्या पध्दती प्रमाणेच नवीन वेतनश्रेणीमध्ये वेतन निश्चिती करण्यांत यावी. याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र , वित्त विभाग ,मंत्रालय ,मुंबई ,दि.३० जानेवारी २०१९ मध्ये सविस्तर सुचना दिलेल्या आहेत .त्यांचे काटेकोरपणे पालन करावे. सुधारित वेतनश्रेणीची अंमलबजावणी दि.०१/०४/२०१९ पासून किंवा जिल्हा उपनिबंधकांनी मान्यता दिल्याचे स्तरापासून होईल, असे आदेश याव्दारे देण्यांत येत आहेत.कोणत्याही परिस्थितीमध्ये सुधारित वेतनेश्रेणी मागील तारेखपासून पूर्वलक्षी प्रभावाने देण्यांत येवू नये व त्याप्रमाणे दिली गेल्यास त्यास कोणत्याही परिस्थितीमध्ये मान्यता मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

५. बाजार समितीने रोजंदारीवर कोणत्याही कामासाठी / कालावधीसाठी / कारणासाठी कोणत्याही कर्मचा-यांची नेमणूक करु नये.अशा प्रकारची नेमणूक केल्यास त्याप्रित्यर्थझालेल्या खर्चास अंदाजपत्रकामध्ये समाविष्ठ केले तरीही मान्यता मिळणार नाही .त्यास बाजार समितीचे सचिव व सर्व संचालक जबाबदार राहतील.

६. प्रत्यक्ष पगार निश्चिती (Pay Fixation) अत्यंत काटेकारेपणे तपासण्यांत यावे.

७. बाजार समितीचे कर्मचा-यांनी बाजार समितीचे उत्पन्न वाढेल तसचे उत्पन्नाचे वसुली मध्ये अडथळे येणार नाहीत याबाबत जागरुक व कार्यक्षम राहावे. जेणे करुन त्यांचे वेतनश्रेणी फायदे त्यांना उपरोक्त अटीस अधिन राहून मिळू शकतील.

( डॉ.किशोर तोष्णिवाल )
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. सभापती /सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व )---------
२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)------------------
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,(सर्व)----------------------
त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व तालुका उप/ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांना वरील परिपत्रकीय सूचना कळविण्यात यावेत.
४. सरव्यवस्थापक, महाराष्ट राज्य कृषी पणन मंडळ , गुलटेकडी ,मार्केटयार्ड, पुणे-३७
५. श्री .दिलीप ल. डेबरे, अध्यक्ष, महाराष्ट राज्य बाजार समिती कर्मचारी संघ, पुणे
६. कार्यकारी संचालक , महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ,पुणे

**प्रत- सविनय सादर**

१. मा. प्रधान सचिव , सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई -३२
२. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे

**- : परिशिष्ट "अ" -:**

| अ.क्र. | वर्गवारी | उत्पन्न | आस्थापना खर्च |
|---|---|---|---|
| १ | अ | रुपये १ कोटीचे वर | ४५% |
| २ | ब | रुपये ५० लाखाचे वर ते १ कोटी पर्यत | ५०% |
| ३ | क | रुपये २५ लाखाच्या वर ते रुपये ५० लाखा पर्यत | ५०% |
| ४ | ड | रुपये २५ लाखापेक्षा कमी | ६०% |

लांडगे ३.८.१९